# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

☎ : २४०१०४३७/ २४०२०७८१/ २४०१४७०१
फॅक्स : २४०१०६८२/ २४०२३५१६
visit us at : http://mpcb.gov.in
E-mail : enquiry@mpcb.gov.in

कल्पतरु पॉईंट, २/ ३/ ४ था माळा,
सिनेट प्लॅनेट समोर, सायन सर्कल,
सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२.

क्र. मप्रनि/ तां.स./ ब- ४३४ दिनांक : २८ .०१.२०१४.

**प रि प त्र क**

**विषय : म.औ.वि.महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रासाठी दि.१३.०७.२००९ च्या शासननिर्णयाप्रमाणे नदीपासुन लागु करण्यात आलेल्या अंतराबाबत खुलासा/ स्पष्टीकरण...**

**संदर्भ : दि.०६.०१.२०१४ रोजी झालेली संमतीपत्र मुल्यांकन समितीची बैठक**

दिनांक ०६.०१.२०१४ रोजी संमतीपत्र मुल्यांकन समितीची बैठक झाली. सदर बैठकीमध्ये असे निदर्शनास आले आहे की, म.औ.वि.महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये उभारण्यात येणाऱ्या उद्योगांबाबत दि.१३.०७.२००९ रोजीच्या शासननिर्णयामध्ये ठरवून दिलेल्या अंतराबाबत मंडळाच्या अधिकाऱ्यांमध्ये संभ्रम आहे.

याबाबत खुलासा/ स्पष्टीकरण करण्यात येते की, जे उद्योग म.औ.वि.महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये प्रस्तावित असतील, त्या क्षेत्रामध्ये जर सांडपाणी एकत्रिकरण, सामाईक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (CETP) व प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची विल्हेवाट यंत्रणा असल्यास, तर नदी काठापासुन ५०० ते ७५० मीटर पट्टयात हरित व नारंगी संवर्गातील उद्योगांना व तदूनंतर म्हणजेच ७५० मीटर अंतरानंतर सर्व संवर्गातील उद्योगांना परवानगी देता येईल. (शासननिर्णय मुद्दा क्र.३)

परंतु ज्या म.औ.वि.महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये सांडपाणी एकत्रिकरण, सामाईक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा (CETP) व प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची विल्हेवाट यंत्रणा नसल्यास, त्यांना राज्यातील सर्वसाधारण उद्योगांसाठी असलेले धोरण शासननिर्णयातील मुद्दा क्र.२ लागु राहील. त्याप्रमाणे नदीच्या सरासरी पूररेषेपासुन ५०० ते १००० मीटरच्या पट्टयात हरित संवर्गातील उद्योग व त्यापुढील १००० मीटरच्या क्षेत्रामध्ये म्हणजेच १००० ते २००० मीटरच्या पट्टयामध्ये हरित व नारंगी संवर्गातील उद्योग व तदूनंतर म्हणजे २००० मीटर नंतर सर्व उद्योगांना परवानगी असेल. **अशाठिकाणी म.औ.वि.महामंडळास अंतरामध्ये शिथिलता/ सवलत देण्यात आलेली नाही. याची नोंद घ्यावी.**

म.प्र.नि.मंडळाच्या संकेतस्थळावर पाटबंधारे विभागाकडून अंतर प्रमाणित करण्याबाबतचा नमुना प्रसिध्द केलेला आहे. परंतु समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, सदर नमुन्यांमध्ये अंतर प्रमाणित केले जात नाही, त्यामुळे अशा प्रस्तावांवर निर्णय घेतांना अडचणी निर्माण होतात. सबब सर्व प्रादेशिक व उप प्रादेशिक अधिकारी यांना सुचना देण्यात येतात की, वरील शासननिर्णयाचे काटेकोरपणे पालन करतांना वरील खुलासा/ स्पष्टीकरण लक्षात घेऊन, त्याप्रमाणे संमतीपत्र अर्ज सादर करतांना सुस्पष्ट शिफारस करावी, जेणेकरुन समितीस योग्य निर्णय घेणे शक्य होईल.

(राजीव कुमार मित्तल)
सदस्य सचिव